आरोग्य विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ५०/६१९९
दि. १३/१०/2020

# परिपत्रक

विषय - **"माझे कुटुंब -माझी जबाबदारी या मोहिमे बरोबरच 'पुण्याचा निर्धार – कोरोना हद्दपार'** ची मोहीमे अंतर्गत दि.१४.१०.२०२० रोजी होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहणे बाबत.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोव्हीड - १९ चा संसर्ग रोखण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी "माझे कुटुंब -माझी जबाबदारी" हि मोहीम राबविण्यात येत आहे. याचा प्रथम टप्पा दि.१५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर २०२० पर्यत राबविण्यात आला आहे आणि पुढील टप्पा दि.१४ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२० पर्यत राबविण्यात येणार आहे. आरोग्य, शिक्षण हा मूळ पाया असलेल्या 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या मोहिमेची पुणे जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी होत आहे.

पुणे जिल्ह्यातील कोरोना-१९ च्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना व कार्यवाही याबाबतच्या कामकाजाबाबत मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये कोरोना बाधितांच्या संसर्गाचे प्रमाण स्थिर व पुढील काही दिवसात हे प्रमाण हळूहळू कमी होण्यासाठी पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि ग्रामीण भागात सामूहिक प्रयत्नांतून माझे कुटुंब - माझी जबाबदारी या मोहिमे बरोबरच **'पुण्याचा निर्धार – कोरोना हद्दपार'** ची मोहीम दि.१४ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२० पर्यत राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने दि.१४.१०.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता पुणे महानगरपालिकेच्या आवारात हिरवळीवर शपथविधीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.महापालिका आयुक्त आणि सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्यसेवा तथा महाराष्ट्र शासनाचे मुख्य समन्वयक उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर कार्यक्रमास सर्व खातेप्रमुख व किमान ५ अधिकारी/कर्मचारी उपस्थित रहावे, हि विनंती.

(डॉ.आशिष भारती)
आरोग्य अधिकारी पुणे मनपा तथा
सदस्य
सामाजिक कृतीशील समुह

प्रत : मा.आयुक्त
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/इ)
माहितीसाठी

प्रत : मा.सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख
मा.सह महापालिका आयुक्त/उपआयुक्त (परिमंडळ १ ते ५)
पुणे महानगरपालिका
पुढील कार्यवाहीसाठी